**केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याबाबत**

# **<u>महाराष्ट्र शासन</u>**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक विसयो-२०१०/प्र.क्र.०१/विसयो-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१२

**वाचा :** १) केंद्र शासनाचे ज्ञापन क्रमांक No.J-11012/1/2009-NSAP दिनांक ३० सप्टेंबर, २००९.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक विसयो-२०१०/प्र.क्र.३३/विसयो-२/दि. १३ जुलै,२०१०.
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२/दि. २६ ऑक्टोंबर,२०१०.
४) महालेखापाल कार्यालयाचे पत्र क्र.TM/Ch.1/SJ&SAD/UOR/1170/दि.१४ डिसेंबर,२०११.

**शासन निर्णय :** केंद्र शासनाने संदर्भ क्र.१ येथील आदेशान्वये इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना सुरु केली आहे. या दोन्ही योजना संदर्भ क्र. ३ येथील आदेशान्वये राज्यात राबविण्यात येत आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजनेतंर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या १८ ते ६४ वयोगटातील ८० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व असलेले किंवा बहु अपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेले) लाभार्थी निवृत्ती वेतनास पात्र आहेत. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रती माह व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत रु.४००/-प्रती माह असे एकूण रु.६००/- प्रती माह इतके निवृत्ती वेतन देण्यात येते. तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या ४० ते ६४ वयोगटातील विधवा लाभ घेण्यास पात्र आहेत. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रती माह व राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत रु.४००/- प्रती माह असे एकूण रु.६००/- प्रती माह निवृत्ती वेतन देण्यात येते.

२. केंद्र शासनाने सुरु केलेल्या या दोन नवीन योजनांसाठी नवीन उपलेखाशीर्ष उघडण्यास महालेखापाल कार्यालयाने संदर्भ क्र.४ येथील आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. या अनुषंगाने इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनासाठी खालीलप्रमाणे (इंग्रजी / मराठी) नवीन उपलेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे -

**१) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना**

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| Demand No. N-3 2235, SOCIAL SECURITY AND WELFARE 02, SOCIAL WELFARE 104, WELFARE OF AGED INFIRM AND DESTITUTE (08) Grant to Destitute, Old People and Landless Labourers (08) (11) Indira Gandhi National Disability Pension Scheme (2235 B049) 50 other Charges | मागणी क्र. एन-३ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाज कल्याण १०४, वृध्द, विकलांग व निराश्रित व्यक्तींचे कल्याण, (०८) विकलांग, वृध्द व्यक्तींना आणि भूमिहिन शेतमजूरांना अनुदान,(०८) (११) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना (२२३५ बी०४९) ५० इतर खर्च |

जिल्हा ... कार्यालय
शाखा:
आवक क्र. 11469
13 MAR 2012

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| Demand No. N-3 2235, SOCIAL SECURITY AND WELFARE 02, SOCIAL WELFARE 104, WELFARE OF AGED INFIRM AND DESTITUTE (08) Grant to Destitute, Old People and Landless Old Labourers (08) (12) Indira Gandhi National Widow Pension Scheme (2235 B031) 50 Other Charges | मागणी क्र. एन-३ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाज कल्याण १०४, वृध्द, विकलांग व निराश्रित व्यक्तींचे कल्याण, (०८) विकलांग, वृध्द व्यक्तींना आणि भूमिहिन शेतमजूरांना अनुदान,(०८) (१२) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना (२२३५ बी ०३१) ५० इतर खर्च |

३. उपरोक्त दोन्ही लेखाशीर्षासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांना व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून संबधित तहसिलदार (संगायो) यांना घोषित करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनासाठीचा खर्च उपरोक्त लेखाशीर्षामधून भागवावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३९२/११/अर्थसंकल्प-७ दि.२८/१२/२०११ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेताक क्र. २०१२०२०४०६०९३७२३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गकिवाघ

(ग.कि.वाघ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व जिल्हयाचे पालकमंत्री
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषी भवन नवी दिल्ली
वित्त विभाग (अर्थसंकल्प-७/व्यय १४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी व लेखा कार्यालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
कक्ष अधिकारी (विसयो-२/अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई -३२
निवड नस्ती कार्यासन, विसयो-१

क्र/संगायो/कावि-७५७/२०१२
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

D/Anushree/Cr01 Visayo/4